Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

निजामाचे कृषी धोरण आणि मराठवाडा : एक अभ्यास

प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील , महिला महाविद्यालय, सोलापूर.

प्रस्तावाना

भारताच्या इतिहासात हैदराबाद संस्थात अतिशय महत्वपुर्ण संस्थान मानले जाते. या हैदराबादच्या आसफजाही घराण्याची स्थापणा १७२४ मध्ये मीर कमरुद्दीन उर्फ निजाम-उल-मुल्क यांनी केली. आलमगीर औरंगजेबाच्या मृत्यूनंतर म्हणजेच १७०७ नंतर मोगल साम्राज्य ऱ्हासाच्या दिशेने गतिमान होऊ लागले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेल्या एकाही सम्राटाला या परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले नाही. याचाच परिणाम म्हणून अनेक लहान मोठया सत्तांचा उदय आणि केंन्द्रीय सत्ता नाममात्र बनली. मोगलांच्या सेवेत असताना निजाम-उल-मुल्कने दक्षिणेचा सुभेदार व साम्राज्याचा वजीर म्हणूनही काम पाहिले होते. नंतर मात्र त्याने मालकांशी असलेले सर्व राजकीय संबंध तोडून स्वत:ला स्वतंत्र सत्ताधिश म्हणून जाहीर केले. त्याचे राज्य हैदराबादचे आसफजाही राज्य म्हणून ओळखले जाते. याचे कारण म्हणजे चिल्कीलीजखानास "निजाम-उल-मुल्क-आसफजहॉ" असा किताब मिळाला होता. या घराण्याची सत्ता सव्वा दोनशे वर्षे १७२४ ते १९४८ पर्यंत अस्तित्वात होती. या आसफजाही घराण्याचा शेवटचा निजाम उस्मान अलीखान हा १९११ ते १९४८ पर्यंत सत्तेवर होता. हैदराबाद हे संस्थान १९ सप्टेंबर १९४८ पर्यंत अस्तित्वात होते.

यावेळी मराठवाडा हा निजामाच्या अंकित होता. हैदराबादच्या निजामांनी मराठवाडयात कृषी धोरण कसे राबविले व त्याचा मराठवाडयावर काय परिणाम झाला. याचा यात अभ्यास केला जाणार आहे.

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने शेती हा येथील मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे मानवी जीवनाचा तो एक आर्थिक कणा मानला जातो. भारत देशाचा आर्थिक विकास, राष्ट्रीय उत्पन्न, देशाची होणारी निर्यात, देशातील रोजगार व त्यावर चालणारे इतर घटक शेतीशी निगडीत आहेत. भरतामध्ये एकुण लोकसंख्येच्या ६८% लोक खेडयात राहतात. आणि त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.[२]

शेतीचा शोध स्त्रियानी लावला.

शेती व्यवसाय हा भारतीय लोकांचा आत्मा आहे. अशी शेती व्यवसायाबद्दल महात्मा गांधींची धारणा होती. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत चालत आलेल्या शेती व्यवसायाचा शोध प्रथम स्त्रियानीच लावला आहे.[३] जेंव्हा पुरुषाला कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी घराबाहेर पडावे लागत असे. त्यामुळे स्त्रिया घर सांभाळीत त्या घराजवळ अंगणात, परसात वनस्पतीची लागवड करु लागल्या. आणि या प्रक्रिये मधूनच शेतीचा शोध लागला. अन्नधान्याचे काही कण मातीत टाकले असता त्या बियापासून वर अंकूर आले. यावरुनच जमीनीतून वेगवेगळया प्रकारची पिके निघु शकतात ही कल्पना प्रथम स्त्रियांनी पुरुषवर्गाला दिली. आणि यामधुनच प्राचीन काळात मानसाला शेतीचा शोध लागला.[४]

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

मध्ययुगीन काळातील बदल

प्राचीन काळी शेती सामुहीक पध्दतीने केली जायची पण मध्ययुगीन काळात राजसत्ताक पध्दती असल्याने जमीन राजाची आहे असे मानले गेले. तो या जमीनी निरनिराळया लोकांकडे लागवडीसाठी देत असत आणि या जमीनीवरील महसूल वसूल करण्याचे काम सरकारी अधिकारी करीत. मुगल काळात जहागिरदार व वतनदार या जमीनी लोकांना लागवडीसाठी देत व त्या जमीनीवर कर वसूल करण्याचे काम जहागिरदार किंवा वतनदार करीत.[५] आधुनिक काळाचा विचार केला तर शेतीला मोठया प्रमाणात महत्व प्राप्त झाले आहे. पुर्वी फक्त जीवनावश्यक पिकांचेच उत्पादन घेतली जाई. परंतु कालांतराने यात बदल झाला. कडधान्य, भाजीपाला या बरोबरच नगदी पिकाचेही उत्पादन घेतले जात आहे.

मराठवाडयातील शेती

मराठवाडयाचा विचार करता जवळजवळ ९०% शेती ही कोरडवाहू असून ती पर्जन्यमानावर निर्भर आहे.[६] मराठवाडा हा प्रदेश प्रामुख्याने कृषी प्रधान असून येथील ८० ते ८५% जनतेची उपजिवीका शेती आणि शेती संलग्न क्षेत्रावर अवलंबून आहे. येथे खाणी, खनिजद्रव्ये किंवा वनसंपत्ती आदी इतर उत्पन्नांची संसाधने उपलब्ध नाहीत. आणि मोठे उदयोगधंदे उपलबध नसल्यामुळे या भागाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी शेती उत्पादन वाढविणे हाच एक महत्वाचा पर्याय आहे. परंतू या विभागात इतर विभागाच्या तुलनेत पाण्याची उपलब्धता फारच कमी आहे. अनिश्चित व तोकडया पर्जन्यमानामुळे येथील शेती उतपादन कमी व अपुरे असून ते येथील जनतेच्या किमान गरजा भागविण्यास पण पर्याप्त नाही. मराठवाडयाचे जवळजवळ ४८% क्षेत्र दुष्काळी छायेत येतो.[७] त्यामुळे मराठवाडयातील शेकऱ्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे.

निजाम राजवटीखालील मराठवाडा

मराठवाडा इतर विभागाच्या तुलनेत मागास राहण्यासाठी जी अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यातील सर्वांत महत्वाचे कारण म्हणजे मराठवाडा १९४८ सालापर्यंत निजाम राजवटीच्या प्रभावाखाली गुलामगिरीच जीवन जगत होता. त्यांना स्वत:ची प्रगती करुन घेण्यासाठी शिक्षणाची, आरोग्याची, शेती विकासासाठी आवश्यक अशी जी यंत्रणा असावयास हवी होती ती अजीबात उपलब्ध नव्हती.

निजाम राजवटीत व्यक्ति स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य व इतर कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती हेच होते. परंतु त्याकाळी जमीन धारणेचे प्रमाण जास्त होते. कारण लोकसंख्या कमी होती. विशेष अशी कोणतीही महत्वाकांक्षा नसलेली मनोवृत्ती, हवामान, पाऊस थोडयाफार प्रमाणात अनुकुल सुपिक जमीन, ज्या वाणांची शेतकरी पेरणी करीत. त्या वाणांवर किड व रोगाचा प्रादुर्भाव कमी असायचा. जनावराना चरण्यासाठी कित्येक हेक्टरी क्षेत्र हिरव्या कुरणांनी व्यापलेले असायचे. त्यामुळे जनावरासाठी भरपूर चारा उपलब्ध होत होता. त्यामुळे पिकांचे उत्पादन आनंदात चालायचे. परंतु ती परिस्थिती नंतर राहिली नाही. भरमसाठ लोकसंख्या वाढली. वाढलेल्या खाणाऱ्या लोकांना पुरेसे अन्न उपलब्ध करुन देण्यासाठी वेगवेगळया बाबींचा मोठया प्रमाणात अवलंब करण्याचे प्रयत्न सुरु झाले.

उदा:. सुधारीत बियांनाचा विकास व वापर सेंद्रीय खताचा अभाव त्यामुळे रासायनिक खता बरोबरच त्याचा वापर ज्या प्रमाणात आवश्यक होता. त्या प्रमाणात तो होऊ शकला नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे इंधनाची गरज भागविण्यासाठी जंगलतोड मोठया प्रमाणात झाली.[८] याचे परिणाम मराठवाडयातील शेती व शेतकऱ्यांवर झाले.

मराठवाडा हा दुषकाळी प्रदेश आहे. गोदावरी मोठी नदी असली तरी तिचा मराठवाडयातील प्रवाह क्षीण आहे. हा कमी पावसाचा प्रदेश असल्याने मराठवाडयात धरण बांधण्यायोग्य नाही. अशी कारणे देवून मराठवाडयातील गोदावरी नदीवर धरण बांधणे शक्य नाही. असा अहवालच हैदराबाद विभागाने सादर केला होता.[९] तेंव्हापासून ते मराठवाडा विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील होऊनही मराठवाडयाची उपेक्षी आजी संपली नाही. मराठवाडयावर सतत अन्याय होत गेला.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

मराठवाडयातील पिके

मराठवाडयात ज्वारी आणि रब्बी या दोन्ही हंगामात विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते. मराठवाडयात निजाम काळात जवारी, बाजरी गहु व तांदुळ ही तृण धान्ये घेतली जात. तूर, मूग, उडीद, हरभरा ही कडधान्ये तर भूईमूग, सुर्यफुल, तीळ, अंबाडी अशी गळीताची धान्य घेतली जात. वाटाणा, मटकी, एरंडी, तंबाखू, मका, हळद, मिरची, बार्ली, हुलगा, मसूर, इत्यादी पिके घेतली जात. काही प्रमाणात पाले भाज्याचेही उत्पादन घेतले जाई.[१०]

पाणी पुरवठा

शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी पाणी पुरवठयाच्या निरनिराळया सोई केल्या जात होत्या. पाऊस व नदया या नैसर्गीक पाणी पुरवठयाच्या साधना बरोबरच विहरी, तलाव, कालवे या साधनाच्या मदतीने पाणी पुरवठा केला जात होता. पाणी पुरवठयाचे मुख्यतः तीन प्रकार होते. जसे :- पोटस्थळ, मोटस्थळ, तलाव, तळी किंवा धरणे.

मध्ययुगीत काळात शेतकऱ्यांनी शेतीतून जीवनावश्यक उत्पादना बरोबरच नागरी पिकांचेही उत्पादन घेतल्याची माहिती मिळते. तथापी या काळात मराठवाडयातील बहुतांश शेती पाण्यावर अवलंबून असल्याने व पावसाचे प्रमाण अनियमित असल्याने या पिकांचे उत्पादन फार मोठया प्रमाणावर होत नसे. शासनाच्या वतीने पाणी पुरवठयाच्या सोई केल्या जात असलया तरी एकुण क्षेत्राच्या मानाने या सोई अतिशय मर्यादितच होत्या.[११]

निजामकालीन मराठवाडयातील जमीन विभागणी

हैदराबाद संस्थानातील जमीनीच्या क्षेत्रफळाचे वर्गीकरण पुढील प्रमाणे :-

१) पानभरु वहीत जमीन :- १३,२३,००० एकर त्याचे प्रमाण २.५
२) कोरडवाहू वहीत जमीन :- २,५१,५२,००० एकर त्याचे प्रमाण ४७.६
३) पडीक जमीन शेती योग्य :- ७६,४९,००० एकर त्याचे प्रमाण १४.५
४) एकुण जमीनीचे क्षेत्रफळ :- ३,४१,२४,००० एकर त्याचे प्रमाण ६४.५

निजाम संस्थानातील ही आकडेवारी लक्षात घेतली तर असे दिसते की, ६२.५% एवढे शेतीचे प्रमाण पाण्यावर अवलंबून होते. २.५% जमीन पानभरु होती. यावरुन निजाम सरकारचे शेतीकडे असे दुर्लक्ष होते, हे दिसून येते. बाकी उरलेल्या पडीक जमीनीचे क्षेत्रफळ ४९,८०,००० एकरचे होते. त्याचे प्रमाण ७.५ होते. आणि जंगलाखाली व्यापलेली जमीन ६१,७०,००० एकर होती. त्याचे प्रमाण ११.६ होते. याशिवाय शेतीसाठी ६६,५१,००० उपलबध नसलेली जमीन होती. त्याचे प्रमाण ७६.४ होते. म्हणजे एकूण क्षेत्रफळाच्या ५०% जमीन शेतीसाठी असून नसल्यासारखी होती. तर कोरडवाहू जमीन ४७% होती. त्यामुळे २% पानभरु जमीनीवर मराठवाडयातील जनतेचा उदरनिर्वाह चाले. यातून निजाम सरकारचे कर देणे, सरकारला तोंड देणे आणि पोटाचा प्रश्न मिटविणे यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांची स्थिती केविलवाणी झाली होती.[१२]

मराठवाडयातील जमीन महसूल पद्धत

हैदराबाद संस्थानातील इतर जिल्हयापमाणे मराठवाडयातील शेतकऱ्यांकडून किती शेतसारा वसूल करावयाचा या संबंधी १८५३ पर्यंत कोणतेच बंधन नव्हते. जो कोणी सरकारला अधिक रक्कम देईल त्यास इजारा म्हणजे शेतसारा वसूल करण्याचे गुत्ते मिळत असत लिलावात तालुक व गुत्ते घेणारे बहुतेक जण हैदराबादमध्येच राहत असत व आपल्या कारभाऱ्यामार्फत वसूलीचे काम करीत असत. शेतसारा वसूलीचे अधिकार मिळविण्यासाठी अनेकजण संस्थानातील मोठ मोठया अधिकाऱ्यांना भेटी देऊन अधिकार प्राप्त करीत शेतीच्या एकुण उत्पन्नापैकी २५ ते ३०% शेतसारा वसूल करण्यात येत होता.

गोविंद बक्षी यांच्याकडे हैदराबादचा उत्तर भाग तर चंदुलालकडे दक्षिण भाग शेसारा वसूलीचे गुत्ते होते. मराठवाडयातील भाग चंदुलालच्या नेतृत्वाखाली येत होता. वसूल झालेल्या शेतसाऱ्यापैकी विशिष्ट रक्कम

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

देशमुख, देशपांडे व सरदेशपांडे यांना दिला जाई. देशमूख देशपांडेशी संगनमत करुन भरमसाठ शेतसारा वसूल केली जाई.

जहागिरी प्रदेशात शेतसारा वसूलीचे प्रमाण यापेक्षा अधिक होते. शिवाय हैदराबाद संस्थानात विविध जिल्हयातील चलनात एकसुत्रता नव्हती. त्याचा फायदा गुत्तेदार घेत असत. उदा.: अमीन नवाजखान यांच्याकडे उस्मानाबाद जिल्हयातील वसूलीचे काम होते. त्याने या जिल्हयाचा शेतसारा हैदराबादमधील चलन दराने सरकारी तिजोरीत भरला. शेतसारा वसूलीचे काम आपल्यालाच मिळावे यासाठी दोन लाख रुपयाच्या भेटी हैदराबाद मधील अनेक अधिकाऱ्यांना दिल्या. अमीर नवाजखान यांच्याकडे महाराष्ट्रातील बीड, धारुर, नळदुर्ग (उस्मानाबाद) येथील शेतसारा वसूलीचे अधिकार होते. नवाजखानाने अधिकाऱ्यांना भेटी दिल्याची माहिती गुलाम हुसैल यांनी लिहलेल्या "तारीख-ए-गुलजारे-ए-असाफिया" या ग्रंथात नोंदविलेली आहे.[१३]

अन्यायकारक शेतसारा व जकात कर

शेतसारा वसूली अतिशय निर्दयपण केली जात असे. एखादा शेतकरी शेतसारा देत नसेल तर त्याच्या पाठीवर आणि डोक्यावर दगड ठेवणे, हातपाय बांधणे, कपडयावर तेल घालून जाळ लावणे असे भयानक प्रकार शेतसारा वसूलीसाठी केले जात. देशमुख देशपांडे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन अनेक शेतकऱ्यांची सुपीक जमीन हडप केली. अनेक शेतकरी भूमीहीन झाले. मराठवाडयात त्या काळात एकही दलित शेतकरी आढळत नसे.

जमीन महसूला व्यतिरिक्त १% जकात व २% अबकारी कर हे निजाम सरकारचे महत्वाचे उत्पन्नाचे साधन होते.

मराठवाडयात नळदुर्ग, जालना, औरंगाबाद, मोमीनाबाद (अंबाजोगाई), पैठण आणि हिंगोली या ठिकाणी जकात वसूल करण्यासाठी करोडगिरी नाके होते. हिंदुस्थानातील इतर राज्याच्या तुलनेत हैदराबाद संस्थानास पयार्याने मराठवाडयात दरडोई कर आकारणी अधिक होती, असे पी.एन. चुडागर या विद्वान लेखकाने नमूद केले आहे. जहागिरदार सुध्दा निजामास नजराणे देत असत. परंतु याचे अप्रत्यक्ष ओझे सामान्य जनतेवरच पडत असे. १९२९ च्या महामंदीने तर शेतीक्षेत्रावर संकटच आले. त्यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्याला आपल्या उदरनिर्वाह करणे कठिण होऊन बसले.[१४]

सावकाराकडून शेतकऱ्यांची होणारी लुट

निजाम सरकारच्या काळात सावकारकीचा व्यवसाय मोठया प्रमाणात जोपासला होता. यात अरब, रोहिले, पठाण अघाडीवर होत. निजाम सरकारला सुध्दा यांच्याकडून कर्जे घेऊन त्याबदल्यात काही जिल्हे (वऱ्हाड, धाराशिव, रायचूर) हे सावकाराकडे गहाण ठेवावे लागले. पहिले सालारजंग दिवाण झाले. तेंव्हा ही कर्जे त्यांनी मिटविली. पण याच सावकारानी नंतर खेडयापाडयातून आपला व्यवसाय सुरु केला. नेहमीच दुष्काळाचे सावट, यामुळे शेतकऱ्यांना व्यापारी व सावकाराकडे गेल्याशिवाय पर्याय नव्हता. पण कर्ज फेडणे शक्य नसल्याने सावकाराकडे जमीन गहाण ठेवाव्या लागत. सर्व संस्थानात अशा मुस्लिम सावकारांची संख्या ३१०६, मारवाडी २१३१ होती. मराठवाडयात मुस्लिम २५८१, मारवाडी १४२९ आणि मराठा सावकारांची संख १८२७ एवढी होती.[१५]

जमीन महसूल पद्धतीचे गैरफायदे

या जमीन महसूल पद्धतीमुळे शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड दयावे लागे. जेंव्हा शेतकरी अतिशय कष्टाने शेतात उभे पीक पहात असे तेंव्हा जमीनदार आपला अंचना नावाचा कर त्यावर लावत. देशमुख, देशपांडेकडून इत्यादीकडून ही वसूली होत असे. आणि त्या शेतकऱ्याला बंदस्ति असलेल्या कबुलियतवर सही करावी लागे. या उभ्या असलेल्या पिकावर जमीनदाराचे एजंट महसूलदार, शिकदार यांचीही नजर असे. एकतर शेतकऱ्यांला पावसाची साथ नसे. सरबस्तेदाराच्या परवानगीने पीक कापणीस परवानगी मिळत असे. शेतकऱ्याला यातील १/२ किंवा १/३ हिस्सा मिळत असे.[१६] शिवाय सावकाराचीही नजर या पिकावर आणि सावकाराच्या गुराढोरावर असे. यामुळे ही पदध्दत शेतकऱ्याला खाऊन जाणारी होती. सगळे जाऊन मराठवाडयातील शेतकऱ्यांकडे दोन वेळचे पोटभर जेवणही नशिबी नसे.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

सरसालारजंग यांच्या जमीन महसूल पध्दतीतील सुधारणा

हैदराबाद संस्थानाच्या पाचवा निजामाच्या काळात सर सालारजंग (मीर ताहनियत अलीखान) यांची दिवाण म्हणून नियुक्ती झाली. सर सालारजंग हे हैदराबादचे दिवाण झाल्यानंतर त्यांनी महसूल पध्दतीत सुधारणा घडवून आणल्या. उदा.: लिलावाद्वारे होणारी महसूल पध्दत बंद केली. भष्ट व लाचखोर अधिकाऱ्यांची हकालपट्टी, देशमुख, देशपांडे यांच्या जागी पगारी अधिकारी नेमले. जमीनीची प्रतवारी पाहून शेतसारा दर निश्चित करण्यात आले. प्रशासनाची जबाबदारी तालुकदार व तहसिलदाराकडे सोपविण्यात आली. कोरडवाहू शेतीस १ रुपये व ओलीताखालील शेतीस पाच रुपये हा शेतसाऱ्याचा दर ठरविण्यात आला. शेतसारा रोखीने वसूल होऊ लागला व मराठवाडयात रयतवारी पध्दत सुरु झाली.[१७]

समालोचन :-

हैदराबादच्या निजामाचे मराठवाडयातील कृषी धोरण पाहिले तर लक्षात येते की, १८५३ पर्यंत निजामानी मन मानेल तसा शेतकऱ्याकडून महसूल वसूल केला. एकतर मराठवाडयातील शेतकऱ्यांना नेहमीची पावसाची अनियमितता, त्यातून निजामाची लिलावाची पध्दत जो अधिक नजराना देईल, त्याला इजारा म्हणजे महसूल वसूलीचे अधिकार मिळत असत. त्यामुळे हे गुत्तेदार किंवा जमीनदार देशमुख देश्पांडे यांच्या मदतीने वसूलीचे काम करीत असत. पण शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मोठयात मोठा हिस्सा वसूली अधिकाऱ्यांच्या खिशात जात असे. शिवाय शेतकऱ्यांना अनेक कारणासाठी सावकार आणि व्यापाऱ्याकडे कर्जे काढावी लागत. आणि आपल्या जमीनी गहाण ठेवाव्या लागत होत्या. अगदी १८५३ पर्यंत मराठवाडयातील शेतकऱ्यांना लिलाव पध्दतीचे आघात सहन करावे लागले. परंतु सर सालारजंग यांच्य काळात मात्र जमीन महसूल पध्दतीत अनेक सुधारणा करण्यात आल्या. याचा फायदा मराठवाडयातील शेतकऱ्यांना काही प्रमाणात झाला असला तरी निजामाच्या कृषी धोरणामुळे मराठवाडयातील शेतकरी नागवला गेला.

संदर्भ साधने

१) कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.१.
२) कायंदे पाटील ग.वि., शेतीचे अर्थशास्त्र आणि धोरण, चैतन्य प्रकाशन, नाशिक, जुलै २००४., पृ.२
३) तत्रैव, पृ.५
४) तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड ६, पृ.४, ३४
५) प्रा. शिंदे पी.एन. / प्रा. प्रवार विश्वनाथ., फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५, पृ.६९
६) पाटील वेदप्रकाश., मराठवाडयातील शेती समस्या व उपाय, मराठवाडीय शेतकऱ्यांचे बोल अंतरीचे (संपा) डॉ. उत्तम इंगळे विस्तार शिक्षण संयनालय मराठवाडा, कृषी विदयापीठ (परभणी) पृ.१
७) जाधव या.र., मराठवाडयाचा विकास आणि जलव्यवस्थापण (डॉ. बा.आ.म.वि.च्या राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्रातर्फे, डि.४ ते १० मार्च २००६ रोजी आयोजित केलेल्या राजर्षी शाहू महाराजाचा विकास दृष्टी आणि मराठवाडयाचा विकास या तीन दिवशीय कार्यशाळेत सादर केलेला शोधनिबंध) पृ.१
८) कलंबकर पंढरीनाथ, मराठवाडयातील शेती समस्या, मराठवाडीय शेतकऱ्यांचे बोल अंतरीचे (संपा) डॉ.उत्तम इंगळे, विस्तार शिक्षण संचनालय, मराठवाडा कृषी विदयापीठ, परभणी, पृ.३२
९) डोईफोड सुधाकर., दै.लोकसत्ता, (लोकरंग) दि.२५ ऑगस्ट १९९६, पृ.६
१०) डॉ.कठारे / डॉ. नगराळे., मराठवाडयाचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९९, पृ.३५
११) प्रा. शिंदे / पी.एन. पवार., पुर्वोक्त पृ.४७
१२) गोविंदभाई श्राफ-विचारपर्व- प्रकाशक-विजय दिवाण-प्रथमावृत्ती २४ जूलै २००४ पृ.२६
१३) काटे पी.व्ही., मराठवाडयाचा इतिहास, कैलास पब्लीकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९९, पृ.११२, ११३.
१४) काटे पी.व्ही., पुर्वोक्त, ११४, ११५

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

१५) भालेराव अनंत., हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई मौज प्रकाशन ग्रह, २००१, पृ.२१
१६) Syed Mahadi Ali- Hyderabad Affairs Vol-VII, Bombay, Times of India, Steam Press, १८८३, p.५७७.
१७) काटे पी.व्ही. पुवोक्त, कित्ता १०५, १०६.